प्रिय, अनुपम अंकल

३० डिसेंबर २०१२ साली तुम्ही एक ट्विट केलं, त्यात लिहिलं, विसरू नका. माफही करू नका. आम्हाला काश्मिरी मुस्लिमांसह पंडित महिलांचाही विसर पडता कामा नये. दोघेही कमी–अधिक प्रमाणात समान दुःखातून गेले आहेत.

पंडिताच्या समस्येला धार्मिक रंग देण्यास विरोध करीत तुम्ही १९ जानेवारी २०१३ला तुम्ही लिहिलंय, मी पाहतोय की काही लोक काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाच्या आक्रोशाला धार्मिक रंग देत आहेत. हा मुद्दा धर्माचा नाही. हा मुद्दा हिंदू आणि मुस्लीम दोघांनी भोगलेल्या मानवी दुःखाबद्दल आहे.

२०२२ साली तुम्हाला हा इशू स्थानिक मुस्लिमांनी उपस्थित केलेला मुद्दा वाटतो. विचारसरणीत इतका ९० अंशीय बदल का घडला?

कलीम अजीम
kalimazim2@gmail.com

प्रिय, अनुपम अंकल

तुम्हास आदराचा सलाम,

मी तुमच्या अभिनयाचा प्रचंड चाहता आहे. मी ज्याचा विरोधक राहिलो आहे, अशा पक्षाचा प्रचार तुम्ही करत आहात. तरीही तुमच्याबद्दल माझा आदर किंचितही कमी झालेला नाही. माहीत नाही का असं होतंय. पण मी तुमच्या अभिनयाचा निखळ चाहता आहे.

तुम्ही माझ्या वेदनांवर हास्याची/समाधानाची फुंकर घातलेली आहे. आजही घालता. त्यामुळेच मी तुम्हाला प्रत्येक भूमिकेत पसंत केलं. भरभरून प्रेम व आत्मीयता दिली. त्यामुळेच कदाचित भाजप व संघ विचारांची भूमिका तुम्ही निवडली, तरीही मी तुमचा आजही तेवढाच आदर आणि सन्मान करतो.

एफटीआय प्रकरणात टीका झाल्यानंतर तुम्ही उघडपणे ‘होय, मी मोदींचा चमचा आहे’, असं विधान केलं. तुम्ही स्वत:ला ‘जमुरा’ म्हणून घेतलं. मला फार दु:ख झालं. पुढे तुम्हाला ‘ले मेरे जमुरे...’ म्हणत तुमच्या आकांनी पद्म सन्मान दिला. त्यावेळी मला खूप आनंद झाला. तुमच्या नावे शुभेच्छा संदेश पाठविला. तुम्ही घेतलेल्या राजकीय भूमिकेसाठी नव्हे, तर अभिनयासाठी तुम्हाला हा सन्मान दिलाय, असं मी स्वत:च्या मनाला समजावलं. तुमच्यावर विनोदी व उपाहात्मक मीम्सचा पाऊस पडत राहिला. मला फरा वाईट वाटलं. अशा अनेक मीम मेकर्सना ब्लॉकसुद्धा केलं. पुढच्या काही प्रसंगात तुम्ही, मी अजूनही भाड्याच्या घरात राहतो, असं म्हटलं. त्यावेळीही मी खूप व्यथित झालो. इतका मोठा अभिनेता, इतका प्रसिद्ध, लोकप्रिय व असंख्य सिनेमे (काम) करूनही स्वतःचं घर घेऊ शकला नाही, त्याबद्दल मनाला फार बोचलं.

१७ मार्च २०२२ला काश्मीर फाईल्स सिनेमाचे चरित्रनायक म्हणून अनुपम अंकल आपण एक ट्विट केलं. त्यात लिहिलं, ‘दि काश्मीर फाईल्स ने ६ दिन में ८० करोड कमायें है...’ शुक्रवारी दुपारी १२ वाजेपर्यंत हा आकडा १०७ कोटी झाल्याचे तुम्ही जगाला सांगितलं. कदाचित हा सिनेमा आपल्याला स्वत:चं घर, बंगला किंवा डुप्लेक्स मिळवून देऊ शकतो. ज्यात तुम्ही आनंदाने राहू शकता. एसी खोलीत बसून भाजपचा प्रचारही करू शकाल. परंतु आपला हा आनंद मला झेपणार नाही. कारण ते घर तुम्ही माझ्या





देश-धर्मबांधवांना शत्रूस्थानी आणून उभे करून मिळवलेलं असेल.

संबंधित सिनेमात तुम्ही आखलेल्या धोरणामुळे समाजात मुसलमानांविरोधात घृणा व विद्वेष माजला आहे. त्यामुळे हजारो देशबांधवाची घरे उद्ध्वस्त होण्याचा धोका संभवतो. त्यात अनेक देशबांधवांचा मृत्यूदेखील होऊ शकतो. उरलेले बेघर होऊ शकतात. रस्त्यावर अन्नान्न फिरू शकतात. कदाचित त्यांच्यापुढे अस्तित्वाचे प्रश्नही निर्माण होऊ होतील.

तुम्ही काश्मिरी पंडितांचा प्रश्न सोडविण्यासाठी संबंधित सिनेमा केलाय, असं उघडपणे म्हणत आहात. परवा एका न्यूज चॅनलवर आपल्याला रडू कोसळलं असं ऐकलं. तुमच्या दुःखात सहभागी होता आले नाही, याचे वाईट वाटते. रुबिका लियाकतने तुम्हाला कवटाळल्याचे मीम्स पाहून तुमच्या वेदनांशी समरूप झालो. परंतु त्यावरचे टुकार व विनोदी मीम पाहून हसू का रडू कळलेच नाही.

काश्मिरी पंडितांच्या वेदनांना जागा करून दिल्याबद्दल तुमचे आभार. ह्या तद्दन व्यावसायिक सिनेमामुळे कोट्यवधींचा गल्ला जमेल पण पंडितांचा प्रश्न सुटणार नाही, हे तुमच्यासहित सबंध जगाला माहीत आहे. २०१४ पूर्वी तुम्हाला काश्मीर प्रश्न हा हिंदू-मुस्लीम इशू नसून हा राजकारण्यांनी बनविलेला मुद्दा आहे, असं वाटत होतं.

हिंदू-मुस्लीम इत्तेहादविषयी तुम्ही सातत्याने बोलत होता. लोकांचे भ्रम दूर करीत होता. पण २०१४ नंतर तुम्हाला देशातील व नंतर काश्मीरचे मुस्लीम शत्रू वाटायला लागले. तुम्ही त्यांच्याबद्दल खूपच अनाप-शनाप उद्गार काढले. तरीही तुम्ही मला आवडत राहिला. तुमच्या जन्मदिनी तुम्हाला शुभेच्छा पाठवीत राहिलो.

तुमचा वाढदिवस होता, त्यावेळी भरभरून शुभेच्छा दिल्या. लंबी उम्र व उत्तम आरोग्याच्या सदिच्छा दिल्या. पण तुम्ही भारतीय मुस्लिमांची उम्र छोटीच राहावी, हे भाजप समर्थकांचे धोरण पूर्ण करण्यासाठी देव पाण्यात घालून बसला आहात, हे उमजतं तेव्हा अधिकच वेदना होतात.

२९ जून २०१० साली तुम्ही लिहिता, माझे मन काश्मीरसाठी रडते. राजकारण आणि दहशतवादाने ही जन्नत तेथील जनतेसाठी जहन्नूम बनवून सोडली आहे. हिंदू आणि मुस्लीम दोघांसाठी. काश्मीर प्रश्नावर होणाऱ्या राजकारणामुळे आपण व्यथित झाला होता. त्यावेळी ३ सप्टेंबर २०११ला तुम्ही लिहिता, समस्या काश्मिरी पंडित आणि मुस्लिमांची नाही. आम्ही वर्षानुवर्षे एकमेकांसोबत शांततेत राहिलो. हे सर्व राजकारण्याचे कारस्थान आहे...

३० डिसेंबर २०१२ साली तुम्ही एक ट्विट केलं, त्यात लिहिलं, विसरू नका. माफही करू नका. आम्हाला काश्मिरी मुस्लिमांसह पंडित महिलांचाही विसर पडता कामा नये. दोघेही कमी-अधिक प्रमाणात समान दुःखातून गेले आहेत.

पंडिताच्या समस्येला धार्मिक रंग देण्यास विरोध करीत तुम्ही १९ जानेवारी २०१३ला तुम्ही लिहिलंय, मी पाहतोय की काही लोक काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाच्या आक्रोशाला धार्मिक रंग देत आहेत. हा मुद्दा धर्माचा नाही. हा मुद्दा हिंदू आणि मुस्लीम दोघांनी भोगलेल्या मानवी दुःखाबद्दल आहे.

२०२२ साली तुम्हाला हा इशू स्थानिक मुस्लिमांनी उपस्थित केलेला मुद्दा वाटतो. विचारसरणीत इतका ९० अंशीय बदल का घडला, याबद्दल आश्चर्य वाटलं. पण जवळपासची राजकीय अडचण पाहता, जरासा व्यावहारिक झालो. भावनिक न होता वेळीच स्वत:ला सावरले.

निव्वळ चर्चेत राहण्यासाठी अनुपम अंकल आपण आपला विवेक व शालीनता राजकारण्यांकडे गहाण ठेवली, याबद्दल राहून राहून फार वाईट वाटतं. चर्चेत राहणं मुद्दा नसेल तर लोकप्रियता हा मुद्दा असावा का? कदाचित तोही नसेल. तुम्ही राजकीय भूमिकेशिवायदेखील लोकप्रिय होता आणि पुढेही राहणार.. इतकेच नाही तरी अजरामर ठरणार. तुम्ही

केलेल्या अभिनयाने/सिनेमातील चरित्र भूमिकांनी तुम्हाला आपल्या आयुष्याला पुरतील इतकी मोठी शिदोरी दिलीय.

मग भाजपचा अनुनय करून पैसा कमावणे हा तर तुमचा उद्देश नाही ना! माझ्या आतल्या मनाला वाटतं तेही नसेल. पण तुमची किरकोळ विधाने पाहून आपल्या आकांना खूश ठेवण्यासाठी व वेगवेगळे लाभ मिळवण्यासाठी आपण आपल्या इच्छेविरुद्ध जाऊ नका. प्रामाणिकपणाने विचार करा, आपणास पैसा हवाय की लोकांचं निखळ व निःस्पृह प्रेम! माझं मन सांगते, तुम्ही दोघांपैकी जनतेच्या निखळ प्रेमाची निवड कराल!

कारण सामान्य जनतेचे सांसारिक उद्ध्वस्तीकरण करून तुम्हाला पैसा कमविण्याची हौस नसावी. त्यामुळे रक्तलांच्छनातून मिळवलेला पैसा तुम्ही लाथाडाल, अशी अपेक्षा आहे. पैसाही मुद्दा नसेल तर आपण शांत चित्त राहून, एकांतात बसून, विवेकाशी संवाद साधून अंतर्मनात डोकावून पाहा. तिथं तुम्हाला रक्तबंबाळ झालेल्या तबरेज अन्सारीचं थडगं दिसेल, तिथं तुम्हाला उनाचे ते कोरडे दिसतील. गोवंश हत्येच्या नावाने झालेल्या मृतांच्या शेकडो विधवांच्या आर्त वेदना दिसतील. तिथंच तुम्हाला रोहित वेमुलाच्या अस्थी दिसतील. बुलंदशहरच्या पोलीस अधिकाऱ्याचं न्यायासाठी झटणारे कुटुंब दिसेल, धर्मांच्या नावाने छळ केलेल्या बलात्कार पीडितांचे हुंकार दिसतील. कठुआची आठ वर्षांची निरागस आसिफा दिसेल. शेजारीच हिंदू धर्माचे उदात्तीकरण करीत बलात्काराच्या दोषींना समर्थन देण्यासाठी काढलेली मिरवणूक दिसेल. बाजूला जय श्रीरामचा धाकाने दिल्ली दंगलीत मारले गेलेल्यांचे निष्पाप चेहरे दिसतील. पुढे कोव्हिड काळात गंगा किनारी पुरलेली मृतदेह भेटतील. वेळेवर उपचार मिळाला नाही म्हणून मरण पावलेला तुमचा वैचारिक मित्र रोहित सरदाना दिसेल.. पंजाब-दिल्ली सीमेवर वर्षभर थंडीच्या कडाक्यात गोठून मृत्यू झालेले ५०० शेतकरी दिसतील. जीपच्या चाकांखाली लखीमपूरच्या शेतकऱ्याला चिरडलेले व्रण दिसतील. तरीही तुम्ही संवेदनाहीन झाला असाल तर ईश्वर तुमचे भले करो! माझं तुमच्यावरील निखळ प्रेम तसूभरही कमी होणार नाही. पण इथून पुढे मात्र तुमच्या राजकीय भूमिकेची कठोर चिकित्सा करीत राहीन.

तुमचा एक सिने चाहता...

कलीम अजीम, पुणे

मेल-kalimazim2@gmail.com

लेखक सामाजिक विषयाचे अभ्यासक आहेत.

अशी भरा वर्गणी

'पुरोगामी जनगर्जना' मासिकाची वार्षिक वर्गणी पोस्टेजसह ३३० रुपये

वर्गणी आपण बँकेत प्रत्यक्ष वा ऑनलाईन भरून आम्हांला फोनवर तपशील कळवा किंवा इमेलने पाठवा.

बँक तपशील
खाते नाव: आरोग्य सेना
बँक नाव: बँक बँक ऑफ बडोदा
शाखा: सुभाषनगर, पुणे
खाते क्रमांक: 07910100006583
खाते प्रकार : सेविंग्ज
IFSC कोड: BARB0SUBHAS

सूचना: पुरोगामी जनगर्जना मासिक 'आरोग्य सेने'तर्फे प्रकाशित होते. त्यामुळे धनादेश लिहिताना 'आरोग्य सेना' या नावे काढावा ही विनंती.

आपण बँकेत वर्गणी भरल्यानंतर आपला पिनकोडसह पूर्ण पत्ता (जवळच्या खुणेसह) व मोबाईल नंबर आम्हांला त्वरित कळवावा म्हणजे आपणास अंक पाठविणे सुलभ होईल.

आमचे फोन नंबर- ०२०-२४४७३०२८ (सकाळी ९ ते ५) व्यवस्थापक रमाकांत सोनवणी- ९५०३७५३०४५
इमेल: puja.monthly@gmail.com